**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

---

**-: प्रेस नोट :-** दिनांक - २९/०५/२०२६

**अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची बृहन्मुंबईमध्ये PIT-NDPS अंतर्गत कारवाई दरम्यान ड्रग्ज् तस्करी करणारी महीला नामे नाजीया रबीउल इस्लाम उर्फ शोभा मंडल, वय ३३ वर्षे, हिस १ वर्षे करीता नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द केलेबाबत.**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे बांद्रा युनिट, अं.प.वि.कक्ष, मुंबई यांनी त्यांचेकडील गु.र.क्र. ९७/२०२५, कलम ८ (क) सह २२ (क) २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अन्वये दाखल गुन्हयात अंमली पदार्थाची तस्करी करणारी अटक आरोपी सराईत महीला गुन्हेगार **नाजीया रबीउल इस्लाम उर्फ शोभा मंडल, वय ३३ वर्षे,** रा.ठि.- जंगी भारतीय १३, सिंहगड हौसींग सोसायटी, तिलक नगर, अंधेरी कुर्ला रोड साकीनाका मुंबई हिचेवर अंमली पदार्थाची तस्करीचे एन.डी.पी.एस. कायदयान्वये एकुण ४ गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले. तसेच नमुद गुन्हयात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन ते न्यायप्रविष्ठ होते. तसेच सदर ड्रग्ज् तस्करी करणारी महीला **नाजीया रबीउल इस्लाम उर्फ शोभा मंडल, वय ३३ वर्षे** ही जामीनावर सुटताच परत अंमली पदार्थाचा व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तिचेविरुदध मा. पोलीस आयुक्त सो. बृहन्मुंबई यांचेवतीने अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, गु.शा. मुंबई यांनी स्थानबध्द आदेश जारी होण्याकरीता मा. स्थानबध्द अधिकारी तथा प्रधान सचिव सो (विशेष) गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदरच्या स्थानबध्द प्रस्तावास गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडुन मंजुरी आदेश प्राप्त झाले. त्यानुसार नमुद महिलेस ताब्यात घेवुन तीला स्थानबध्द आदेशाची बजावणी करून ०१ वर्ष स्थानबध्दतेकरीता दि. २८/०५/२०२६ रोजी नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे दाखल करण्यात आले आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२६ मध्ये अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये सन २०२६ मध्ये जामीनावर सुटल्यानंतर वांरवार गुन्हे करणा-या आठ आरोपींना स्थानबध्द केले असून ही स्थानबध्दतेची नववी कारवाई आहे.

- **नाजीया रबीउल इस्लाम उर्फ शोभा मंडल, वय ३३ वर्षे** ही अंमली पदार्थ व्यवसायात सक्रीय असल्याचे अंमली पदार्थ विरोधी कायदयाअंतर्गत दाखल गुन्हे अभिलेख :-

१) बांद्रा युनिट, अ.प.वि.क, मुंबई गु.क्र. ९७/२०२५,कलम ८(क) सह २२(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
२) कांदीवली युनिट अ.प.वि.क, मुंबई गु.क्र. ५०/२०२५, कलम ८(क) सह २२,२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
३) बांद्रा युनिट, अ.प.वि.क, मुंबई २०/२०२४, कलम ८(क) सह २२ (क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
४) डी.बी.मार्ग पो .ठाणे , गु.र.क्र. २८/२०२३, कलम ८(क) सह २१ (ब) २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५

सदरची यशस्वी कामगिरी ही मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री.अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. नवनाथ ढवळे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व मा.श्री.सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, बांद्रा युनिटचे प्रभारी पो.नि. विशाल चंदनशिवे, यांचे नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक विजय गोळे, तसेच गुन्हे प्रतिबंधक शाखेचे व.पो.नि. सुवर्णा अडसुळे, पो.नि. सरीता गावडे, स.पो.नि. रविंद्र पाटील, पो.उ.नि. संदिप शिंदे, पो.उ.नि. सतिश निंबाळकर यांनी केली आहे.

------0000------